# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दि.२७/८/२००९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१३) इतिवृत्त**

गुरूवार, दिनांक २७ ऑगष्ट २००९ रोजी सकाळी ११.०० वाजता गणपुर्ती अभावी तहकुब करण्यात आलेली स्थायी समितीची सभा मा.सभापती श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **दुपारी ०४.५५ वाजता** 'वंदे मातरम्' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त श्री. पुरूषोत्तम भापकर, भा.प्र.से., नगर सचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबंधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.

०१. श्री. कटकटे सतीश विश्वनाथ
०२. श्री. जावेद हसन खान
०३. श्री. गवळी रविकांत काशीनाथ
०४. श्री. घडमोडे भगवान देवीदास
०५. श्री. सुरे सिताराम इसराम
०६. श्री. कुचे नारायण तिलोकचंद
०७. श्रीमती मेहरून्नीसा खान हमीद खान
०८. श्री. पांडे विनायक प्रभाकर
०९. श्री. निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
१०. सौ. मोमीन सफिया फिरदौस

(सभागृहात Voilea Enviornment चे Presentation दाखविण्यात आले.)

**<u>संवाद :</u>**

श्रीमती सफिया मोमीन : मा.आयुक्तांचे अभिनंदन करण्यात येते की, त्यांनी उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजूंच्या कामांना मंजूरी दिली.

मा.सभापती : मा.आयुक्तांनी काम केल्यामुळे त्यांचे अभिनंदन करण्यात येते.

श्री.खान मेहरून्निसा : वार्ड वाईज बजेट ठेवायला पाहिजे.

श्री.प्रल्हाद निमगांवकर : छोटया छोटया कामांच्या मंजूरीसाठी मुख्यालयात यावे लागते, लेखा विभागात आल्यावर बजेट संपल्याचे सांगीतले जाते. निधी नाही म्हणून सांगीतले जाते. पावसामुळे रस्त्यांमधे खड्डे पडलेले आहे त्यात मुरूम टाकणे गरजेचे आहे.

मुख्यलेखाधिकारी : किरकोळ देखभाल दुरूस्ती कामासाठी बजेटमधे 20 कोटींची तरतुद केलेली आहे. ती वार्ड निहाय विभागणी केलेली आहे. कामे प्रस्तावित करू शकतात.

श्री.प्रल्हाद निमगांवकर : माझ्या वार्डात रस्त्यांमधे मोठमोठे खड्डे पडलेले आहे काम करण्यास निधी उपलब्ध नाही.

श्रीमती खान मेहरून्निसा : किरकोळ कामे करण्यासाठी मुख्यालयात यावे लागते, किरकोळ कामे करण्यासाठी वार्डाला अधिकार देण्यात यावे.

श्री.नारायण कुचे : वार्ड इंजिनिअरच्या म्हणण्यानुसार बजेट उपलब्ध नाही किंवा संबधीत कामासाठी निधी उपलब्ध नाही म्हणुन सांगण्यात येते.

मा.सभापती : प्रशासनाने 20 कोटीची तरतुद केलेली आहे कामे चालू आहे.

श्रीमती खान मेहरून्निसा : वार्ड इंजिनिअरच्या म्हणण्यानुसार वार्डासाठी बजेट ठेवण्यात आलेले नाही. तसे त्यांना लेखाी आदेश दिले गेले पाहिजे.

मा.सभापती : सर्व वार्ड अधिकारी आणि वार्ड इंजिनिअर यांना सूचना देण्यात यावी की, प्रशासनाने 20 कोटींची तरतुद ठेवलेली आहे नगरसेवकांचे कामे अडविण्यात येवू नये. तात्काळ कामे सुरू करण्याचे आदेश देण्यात यावी. गणेशउत्सव येत असल्याने मा.आयुक्तांनी रस्त्यांतील खड्डे बुजविण्याचे आदेश दिलेले आहे.

श्री.नारायण कुचे : ज्या रस्त्यांवर गणेश मंडळ बसलेले आहे त्या रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यात यावे.

श्री.भगवान घडमोड : माझ्या वार्डात रोडवर मोठमोठे खड्डे पडलेले आहे.

श्रीमती खान मेहरून्निसा : मा.महापौरांनी शहरातील रस्त्यांची दुरूस्तीचे आदेश दिलेले आहे.

मा.सभापती : रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याचे काम सुरू आहे.

श्री.सतिष कटकटे : ए वन आणि रेटलिस्ट बाबत माहिती देण्यात यावी.

मुख्यलेखाधिकारी : रेट लिस्टच्या बाबतीत लेखा विभागात प्रत्येक वार्डाकडुन याद्या आलेल्या आहेत. त्याचेसाठीचे दरपत्रक मागविण्यात आलेले आहे. त्याची कार्यवाही झालेली आहे एवनच्या बाबतीत दर तीन दिवसांची शॉर्ट टेंडर नोटीस देत आहे त्याचे कोटेशन उघडलेले आहे.उघडल्यानंतर संबधीत वार्डाला जी एजन्सी फिक्स झाली त्याच्या नावासह देतो त्यांनी त्या लेव्हलवर त्यांच्याकडुन काम करून घ्यावे. माझ्याकडे एक हजार ए-वन कामाची यादी आलेली आहे.

श्रीमती खान मेहरून्निसा : वार्ड इंजिनिअर यांनी माहिती देण्यात यावी.

श्री.नारायण कुचे : पुढील बैठकीत अधिकाऱ्यांनी सहा वार्डाची माहिती द्यावी.

मा.सभापती : पुढील होणाऱ्या सभेत माहिती देण्यात यावी. सभागृहास जो पर्यंत माहिती देण्यात येत नाही तोपर्यंत कुठल्याही एवन व रेट लिस्टचे बिल काढु नये.

श्रीमती मोमिन सफिया : महानगरपालिकेतील दैनिक वेतन कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देण्यात आलेली नाही तसेच सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे दैनिक वेतन कर्मचाऱ्यांना वेतन देण्यात यावे.

मा.सभापती : मुदतवाढ देण्यात आली आहे. दैनिक वेतन कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन देण्यासाठी सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येईल.

श्री.भगवान घडमोडे : मागील बैठकीत कुशीनारा गृहनिर्माण सोसायटीबाबत चर्चा झाली होती. 24 तासात कार्यवाहीचे आदेश दिले होते त्याबाबतीत माहिती देण्यात यावी.

मा.सभापती : त्याबाबतीत प्रशासनाकडुन कालच माहिती घेतली आहे प्रशासनाने 24 तासांची कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. एका कर्मचाऱ्यास 7 वाजुन 5 मिनिटांनी नोटीस मिळाली एकाला पाच वाजता मिळाली 24 तास सात वाजता होईल. त्यानंतर मा.आयुक्त निर्णय घेतील.

श्री.भगवान घडमोडे : कामगार अधिकारी श्री.लोखंडे यांना मुदतवाढच देत आहे. सदरील प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे खुलासा करण्यात यावा.

मा.आयुक्त : कामगार अधिकारी यांना नोटीस दिली होती त्यानंतर त्यांनी सात दिवसांची मुदत मागीतली होती सात दिवसांची मुदत त्यांना दिले नाही. आजपर्यंतची कामगार अधिकारी यांना मुदत दिली होती. कालच्या तारखेलाच पीएचडी सारखा खुलासा सादर केला. एवढा मोठा कागदांचा खुलासा केलेला आहे. तपासायला वेळ लागेल.

श्री.भगवान घडमोडे : संबधीत अधिकाऱ्यांच्या बाबतीत मत आहे की, कामगार अधिकारी यांना त्या ठिकाणी ठेवणे योग्य नाही. तत्कालिन आयुक्तांवर आरोप ते लावू शकतात. पी.ए.ची साक्ष ते तेथे थांबले तर काहीही करू शकतात. त्यांचा विचार मोठा आहे.

मा.आयुक्त : तत्कालिन आयुक्तांवर आरोप केले की नाही हे मला माहित नाही परंतु आत्ताचे सहायक आयुक्त आणि उपआयुक्त यांच्यासदर्भांत केलेले आहे. आजपर्यंत कामगार अधिकारी यांना मुदत दिली होती निर्णय घेण्यात येईल.

मा.सभापती : कामगार अधिकारी यांचेवर लवकरच कारवाई होईल.

श्रीमती सफिया मोमीन : गुंठेवारी विभागात कुठलेच काम होत नाही, महानगरपालिकेने जी एजन्सी नेमली होती त्या एजन्सीने 765 रूपये प्रती घेउन कुठलेच कामे केलेली नाही. गुंठेवारी विभाग बंद करण्यात यावा.

श्रीमती खान मेहरून्निसा : लेआउट मधेही गुंठेवारी होत आहे.

मा.सभापती : शासनाचा निर्णय आहे मुख्यलेखाधिकारी आणि प्रशासन कुणीच काही करू शकत नाही.

श्रीमती खान मेहरून्निसा : औरंगाबाद टाइम्स कॉलनी हि गुंठेवारीत आहे काय?

मा.सभापती : नियमानुसार मुख्य लेखाधिकारी यांनी कार्यवाही केलेली आहे.

श्रीमती सफिया मोमीन : माझ्या वार्डातील सर्व लाईट बंद अवस्थेत आहे.

श्री.भगवान घडमोडे : जे कर्मचारी आजारी पडले किंवा त्यांचे नातेवाईक,स्वतः यांचा अपघात झ ाला तर त्यांना बिल मिळण्यास अडचणी निर्माण होतात. ॲडव्हान्स मिळण्यास त्रास होतो. मिनाताई कर्मचारी यांचे हाताचे फॅक्चर झाल्यावर त्यांना अनेक चकरा माराव्या लागल्यात परंतु काही कर्मचाऱ्यांना कुठला आजार होता,काय झाले होते याबाबतची चौकशी न करता अग्रीम दिली जाते. शासनाचे नियम अग्रीम बाबतचे तसेच कुठल्या आजाराबाबत अग्रीम देवू शकतो त्याबाबत खुलासा करण्यात यावा. तसेच कुठल्या कर्मचाऱ्यांना कुठल्या आजाराबाबत तसेच किती अग्रीम दिले याबाबतची माहिती देण्यात यावी.

मुख्यलेखाधिकारी : शासन निर्णयानुसार पाच गंभीर आजारासाठी दिड लाखाची मर्यादेपर्यंत अग्रीम दिली जाते. कर्मचाऱ्यांचा जो खर्च जास्त झाला असेल तर परतावा कितीही रूपयांपर्यंत करता येते.

श्री.भगवान घडमोडे : लाभ घेतलेल्या कर्मचारी/अधिकाऱ्यांची यादी देण्यात यावी.

मा.सभापती : पुढील बैठकीत माहिती देण्यात यावी.

श्री.रविकांत गवळी : 2/3 वर्षात अतिक्रमण काढण्याबद्दल अभिनंदन. मा.बंड साहेबांनी महानगरपालिकेचे भूखंड खाली करून घेतले, ताब्यात घेतले. क्रांती चौकातील रोड वाईडिंगमधील अतिक्रमण काढले तर आजही त्या भुखंडधारकांना मोबदला देवू शकलो नाही. आजही ते अतिक्रमण पाडलेल्या अवस्थेत आहे. महानगरपालिकेच्या मालकी हक्काचे पीआर कार्डवर नोंद घेणे अपेक्षीत आहे. पुन्हा अतिक्रमण होण्यासाठी वाव देत आहे.

मा.सभापती : याबाबतीत मा.आयुक्तांनी महापौरांच्या दालनामधे बैठक घेतलेली आहे योग्य ते निर्देश देण्यात आलेले आहे.

श्री.रविकांत गवळी : पैठणगेट सादिया टॉकीज येथे महानगरपालिकेची स्वत:ची जागा आहे तेथील दुकाने लिजवर दिलेल्या आहेत. पीआर कार्डवर नोंद घेण्यासाठी मा.आयुक्तांनी निर्देश दिलेले आहे. दोन महिणे झालेले आहे पीआरकार्ड वर नोंद घेण्यात आली नाही.

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.रविकांत गवळी : गाळेधारकांना दुकाना रिकाम्या करण्यासंदर्भात सुचना केलेल्या आहेत. आज तीन महिणे झालेले आहे पीआर कार्डवर नोंद घेण्यात आलेली नाही. आज रोजी गाळेधारक दुकाना रिकाम्या करण्यास तयार आहे. परंतु आपले जो पर्यंत नाव लागत नाही तो पर्यंत दुकाना पाडुन ठेवायच्या व इतरांनी पुन्हा अतिक्रमण करण्याची मुभा द्यायची काय? जोपर्यंत महानगरपालिकेचे पीआर कार्डवर नांव लागत नाही तोपर्यंत दुकाना रिकाम्या करून घेवु नये. दुकाना रिकाम्या करून घेण्यास आमचा विरोध नाही.

मा.सभापती : त्यावेळेस तत्कालिन आयुक्त श्री.गुप्ता साहेब होते त्यावेळेस प्रिया मार्केटचे टेंडर काढुन लाखो रूपये फिस देण्यात आली. भुमिपूजनाची तारीख निश्चित झाल्यावर कळाले की, जागा महानगरपालिकेच्या नावावर नाही. आजपर्यंत पी.आर. कार्डवर नोंद घेतलेली नाही.

मा.सभापती : पी. आर. कार्डवर नोंद घेण्यात यावी.

उपआयुक्त(प्र) : रॉक्सी टॉकीजच्या बाजूला महानगरपालिकेची जी जागा आहे त्या ठिकाणी महानगरपालिकेचे शॉपिंग कॉम्पलेक्स आहे. तत्कालिन आयुक्त श्री.बंड साहेब राऊंड घेण्यासाठी त्या भागात गेले तेव्हा त्यांच्या निर्देशनास हि बाब आली. त्या ठिकाणी 36 दुकाने आहेत. जवळपास 30 वर्षापुर्वी सदरच्या दुकाना भाडेतत्वावर दिलेल्या आहेत. त्यापैकी 17 मुळ भाडेकरू आहेत आणि 17 भाडेकरू हे पोट भाडेकरू आहेत. तत्कालिन आयुक्त श्री.बंड साहेबांनी त्यावेळेस संपूर्ण माहिती घेवून आदेश दिला की, सदरील दुकानांच्या उत्पन्नातुन जे भाडे महानगरपालिकेला मिळते ते कमी असल्यामुळे त्या ठिकाणी एक नविन सुपर मार्केट बांधावे त्यासाठी ती जागा

ताब्यात घेण्याची कार्यवाही करावी. अशा पध्दतीचे आदेश तत्कालिन आयुक्तांनी दिले होते. अधिनियमाच्या कलम 81 ब प्रमाणे सदरील जागा खाली करण्याबाबत कार्यवाही देखील चालू केलेली आहे. कलम 81 ब प्रमाणे जागा सोडण्याबाबत (व्हॅकेट) आणि जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्याबाबत कार्यवाही करण्यात आली. त्यासाठी 35 लोक सुनावणीसाठी मा.आयुक्तांनी उपआयुक्त(प्र) यांचेकडे अधिकार दिले त्यामुळे मी सुनावणी घेतली त्यात प्रत्येक भाडेकरूनी वर्षाला भाडे भरलेले आहे. 17 जे पोटभाडेकरू आहे त्यांनी महानगरपालिकेची कोणतीही परवानगी घेतलेली नाही. हया बाबी समोर आल्या त्यामुळे सदरील जागा महानगरपालिकेच्या सार्वजनीक हिताची असल्यामुळे तसेच जे पोटभाडेकरू ठेवलेले आहे त्यास महानगरपालिकेची कुठलीही परवानगी नसतांना जागेचा उपभोग करीत असल्यामुळे सदरील जागा 30 दिवसांत खाली करण्याबाबत आदेश दिलेले आहे.

श्री.रविकांत गवळी : महानगरपालिकेच्या ताब्यात घेवून नविन शॉपिंग कॉम्पलेक्स बांधण्याच्या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो. यापुर्वी वसंतभुवन जागेच्या आखीव पत्रिकेवर आपले नांव लावले आहे.

उपआयुक्त (प्र) : 36 भाडेकरू असून सदरील जागेवर महानगरपालिकेचेच नाव आहे. काही भाडेकरूनी स्वतःच्या नावांवर केलेली आहे ते रद्द करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

मा.सभापती : प्रशासनाने जी कार्यवाही केलेली आहे ती योग्य आहे.

श्री.रविकांत गवळी : पी. आर. कार्डवर नोंद असणे आवश्यक आहे. महानगरपालिकेला त्या जागेवर जे डेव्हलपमेंट करायचे आहे त्यास विरोध नाही परंतु सर्वात पहिले पीआर कार्डवर नोंद होणे अपेक्षीत आहे. पीआर कार्डवर खाजगी व्यक्तिंचे नांवे आहेत. मा.आयुक्तांचेही पीआर कार्डवर महानगरपालिकेचे नांव समाविष्ट करून घ्यावे असे आदेश आहेत.

श्री.सतीश कटकटे : नगर परिषदेचे नांव आहे.

उप आयुक्त (प्र.) : नगर परिषदेचे नांव असले तरी चालते.

मा.सभापती : प्रशासनाच्या म्हणण्यानुसार पी.आर. कार्ड नगर परिषदेच्या नावांवर आहे.

श्री.रविकांत गवळी : महानगरपालिकेच्या नावांवर वर्ग करणे आवश्यक आहे.

श्री.सतिष कटकटे : बीओटीचा प्रकल्प किती वर्षांनी तयार होणार आहे. आज रोजी दुकाना खाली करून घेतल्यावर त्या ठिकाणी तात्काळ काम सुरू होणार आहे काय? प्रशासनाचे नियोजन काय आहे.

बीओटी कक्ष प्रमुख : सदरील प्रकरणामधे दोन केसेस आहे. काही दुकाना खाजगी व्यक्तिंनी स्वतःच्या नावावर दुकाना केल्या आहेत समोरच्या लाईनमधील ज्या मोठया 7 दुकाने आहेत. त्यासाठी मा.श्री.बंड साहेब, मा.श्री.वैद्य साहेब यांनी हेअरींग घेतलेली आहे. मुदत दिलेली आहे. 11 महिण्यांच्या लिजवर आहे,दुकाना केव्हाही खाली करू शकतो.

मा.सभापती : प्रोजेक्टचे काम कुठपर्यंत आलेले आहे.

बीओटी कक्ष प्रमुख : तत्कालिन आयुक्त श्री.बंड साहेबांनी सांगीतले होते की, ताबडतोब बीओटी करण्यात यावे. परंतु मी स्वत:साईडवर गेलो होते जोपर्यत आपण याचे मालक नाही तो पर्यंत बीओटी करता येणार नाही. आपली बीओटी ची तयारी आहे.

मा.सभापती : उद्या जर महानगरपालिकेने जमीन रिकामी करून घेतली तर तात्काळ काम सुरू करण्याची प्रशासनाची तयारी आहे काय? बीओटीची एजन्सी फिक्स झाली आहे काय?

बीओटी कक्ष प्रमुख : बीओटीची एजन्सी फिक्स होणार आहे.

मा.सभापती : वेळ किती लागणार आहे.

बीओटी कक्ष प्रमुख : कमीत कमी एक महिना लागणार आहे.

मा.सभापती : दोन महिणे आचारसंहिता आहे.

बीओटी कक्ष प्रमुख : महानगरपालिकेकडे पीआर कार्ड नाही आपण त्याचे मालक नाही त्यामुळे बीओटी करता येणार नाही.

श्री.रविकांत गवळी : प्रशासनाने खुलासा केला आहे की, महानगरपालिकेकडे पीआर कार्ड नाही आपण त्याचे मालक नाही त्यामुळे बीओटी करता येणार नाही.

मा.सभापती : बीओटीचे डिजाईन तयार आहे काय?

बीओटी कक्ष प्रमुख : बीओटी कमिटीमधे घ्यावे लागेल.

श्री.भगवान घडमोडे : पीआर कार्डवर महानगरपालिकेचे नांव नसल्याने त्या ठिकाणी महानगरपालिका काहीच करू शकत नाही.

मा.सभापती : ज्या सदस्यांना ज्या विषयावर चर्चा करायची आहे त्यांनी तिन दिवस अगोदर सभापतीला आणि प्रशासनाला लिखीत स्वरूपात कळवावे म्हणजे प्रशासनास पुर्ण तयारी करण्यास, उत्तर देण्यास माहिती तयार ठेवता येईल.

श्री.सतिष कटकटे : संबधीत दुकानांमधे पोट भाडेकरू घुसलेले आहे.

श्री.भगवान घडमोडे : पोट भाडेकरू त्या ठिकाणी आले कसे.

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा करावा की, कोणत्या नियमानुसार पोट भाडेकरू तिथे आले आणि कोणत्या नियमानुसार त्यांच्याकडुन भाडे वसुल केले जाते. बिओटीसाठी किती कालावधी लागणार आहे सांगण्यात यावे.

बीओटी कक्ष प्रमुख : एकदा निश्चित झाले की, आपण त्या जागेचे मालक आहे पीआर कार्ड महानगरपालिकेच्या नावांवर झाले की, एरीया कंट्रोल करावे लागेल,

श्री.भगवान घडमोडे : पोट भाडेकरू यांचेकडुन कोणत्या नियमानुसार त्यांच्याकडुन भाडे वसुल केले. पीआर कार्डवर नाव नसल्यामुळे त्या जागेच्या पाठीमागे बेकायदेशील फ्लॅट झाले आहेत. त्याचीसुध्दा चौकशी लावण्यात यावी.

मा.सभापती : महानगरपालिकेचे तत्कालिन आयुक्तांनी जागा हडप करू नये म्हणून उपाययोजना केलेली आहे तसेच मा.आयुक्तांनी भुखंडाबाबत बैठक घेउन योग्य ते निर्देश दिलेले आहे. 11 महिण्यांसाठी लिज वर दुकाने आहे ती लिज संपलेली आहे तसेच मा.आयुक्तांनी सांगीतलेले आहे की, महानगरपालिकेने कॅव्हेट दाखल केले.

श्री.रविकांत गवळी : हेअरींगच्या वेळेस संबधीत दुकानदारांनी लेखी लिहुन दिलेले आहे की, महानगरपालिका सांगेल तेव्हा दुकाना खाली करण्यात येईल.

श्री.भगवान घडमोडे : जो पर्यंत प्रकल्पाला सुरवात होत नाही, बिओटी होत नाही तो पर्यंत संबधीत दुकानदारांना 11 महिण्यांची मुदतवाढ देण्यात यावी व बिओटी झाल्यावर दुकाने रिकामी करून घ्यावीत.

मा.सभापती : शहराचा अतिसंवेदनशील भाग आहे, उदया त्या ठिकाणी जनावरे बांधल्यास आपण काही करू शकणार नाही. प्रशासनाने खुलासा करावा की, बिओटीसाठी किती वेळ लागणार आहे.

बीओटी कक्ष प्रमुख : बिओटी कमिटीमधे मान्यता घ्यावी लागेल त्यासाठी कमीत कमी आठ दिवसा लागेल, 15 दिवस प्लॅनिंग करण्यास लागेल, कमीत कमी एक महिणा कालावधी लागेल.

मा.सभापती : पीआर कार्डवर महानगरपालिकेचे नांव नसतांना बिओटी करता येईल काय?

बीओटी कक्ष प्रमुख : पीआर कार्डवर नांव असल्याशिवाय टेंडर कॉल कसे करणार?

मा.आयुक्त : जी बैठक संपन्न झाली त्या बैठकीत ठरले होते की, ज्या जागा महानगरपालिकेच्या नांवावर नाहीत त्याचा पाठपुरावा करायचा, तसा पाठपुरावा रोज सुरू आहे. यासंबधी सकाळीच शहर अभियंता मालमत्ता अधिकारी तसेच इतर अधिकारी यांना वैयक्तिक बोलावून कार्यक्रम तयार करण्यास सांगीतलेला आहे. एक वाहन उपलब्ध करून दिलेले आहे. रोजच्या रोज संबधीत अधिकाऱ्यांशी संपर्क साधुन पाठपुरावा करावा. पीआर कार्ड नाही परंतु ताबा महानगरपालिकेचा आहे किंवा पीआर कार्डमधे काही अडचण आहे, त्यानुषंगाने तातडीने पीआर कार्ड बनविणे आणि पुर्वीचे जे गाळेधारक होते त्यांचे हेअरिंग झालेले आहे कायदेशीर प्रोसेस सुरू झालेली आहे. एक महिण्याचा कालावधी दिलेला आहे. गाळे चुकीचे दिलेले आहे पोट भाडेकरू शिरलेले आहे तो सर्व इतिहास शोधण्यापैक्षा आता प्रशासन त्याच्या पाठीमागे लागलेले आहे. ज्या ज्या ठिकाणी बीओटीने किंवा तातडीने काम करायचे आहे अशा प्रॉपर्टी शोधुन पीआर कार्डवर नांव लावुन पुढील कार्यक्रम करणे. प्रॉपटी ताब्यात घेण्यासाठी हेअरींग, कॅव्हेट दाखल करणे ईत्यांदी बाबी पुर्ण झालेल्या आहेत. मुदतवाढ देण्यासंदर्भात नंतर विचार करता येईल आज त्यांना जनरल स्वरूप करून त्यांना वाढून देणे योग्य होणार नाही कारण मुळात त्या ठिकाणी पोटभाडेकरू शिरलेले आहेत. निर्णय घेतांना सर्व बाबी बघाव्या लागतील जेणे करून उद्या काम सुरू करतातंना अडचणी येणार नाही.

श्री.सतिष कटकटे : ज्या दुकाना खाली करणार आहे बीओटीमधे तर त्यांना नोटीस देणार आहे का?

मा.आयुक्त : बीओटीच्या टर्म्स आणि कंडिशन आज सांगू शकत नाही.

श्री.सतिष कटकटे : 30 ते 40 वर्षापासून मुळ मालक भाडे भरणाऱ्यांना दुकाना देणार नाही बीओटीने देणार आहेत.

मा.आयुक्त : प्रश्न कुणाला काय देणार हा आज काहीच सांगू शकणार नाही. सुरवातीस महानगरपालिकेचे गाळे मालमत्ता सुरक्षीत करून घेणे महानगरपालिकेच्या ताब्यात राहणे आणि चुकीच्या पध्दतीने जे गेले ते थांबविणे एवढे आहे.

श्री.रविकांत गवळी : 17 भाडेकरू आणि 17 पोटभाडेकरू यासर्वांनी लेखीस्वरूपात लिहुन दिलेले आहे की, पाहिजे तेव्हा दुकाना खाली करून देण्यास तयार आहे. दुकाना खाली करून घेतल्या तर आजूबाजुला ज्या वसाहती आहे त्यामुळे अतिक्रमण होण्याची दाट शक्यता आहे. जोपर्यंत पीआर कार्डवर महानगरपालिकेची मालकी नोंद होत नाही तोपर्यंत त्यांना तिथेच राहू द्यावे म्हणजे अतिक्रमण होणार नाही.

श्री.भगवान घडमोडे : सध्या पावसाळयाचे दिवस आहे पी.आर. कार्डवर महानगरपालिकेच्या मालकीची जो पर्यंत नोंद होत नाही तोपर्यंत त्यांना मुदतवाढ देण्यात यावी.

मा.सभापती : श्री.खरवडकर यांनी गुंठेवारी बाबत खुलासा करावा.

श्री.खरवडकर : शहरातील 114 जुण्या वसाहतींचा सर्वे सात एजन्सी मार्फत सर्व्हे करण्यात आला आणि त्या सात एजन्सीला गुंठेवारी विकासाच्या संचिका तयार करण्यासाठी त्यांना नियुक्त केले. गुंठेवारीधारकाकडुन संचिकेसाठी 762 रूपये जमा करून घेत होते. ती संचिका वार्ड कार्यालयास सादर होत होती 50 टक्के प्रशमन शुल्क आणि विकास आकार भरायचा असतो परंतु ज्या लोकांनी कंन्सल्टंटकडे पेपर दिले नाहीत अशा संचिका सादर झाल्या नसतील. स.सदस्यांकडे ज्या तक्रारी असतील त्या माझ्याकडे दयाव्यात म्हणजे त्याचा निपटारा करण्यात येईल.

श्रीमती खान मेहरून्निसा : आपल्याकडे संचिका आल्यावर त्यांना स्लिप दिलेली आहे काय?

श्री.खरवडकर : स्लिप देण्यात आलेली आहे. नेहरू नगरच्या 50 ते 60 संचिका आलेल्या आहेत. सविस्तर माहिती पुढील बैठकीत देण्यात येईल.

श्रीमती खान मेहरून्निसा : रमजानचा महिना तसेच गणेश उत्सव आहे तरी वार्डातील सर्व लाईट बंद स्थितीत आहे.

मा.सभापती : पैठणगेट येथील रॉक्सी सिनेमा टॉकीज जवळील व्यापारी संकुल मनपाच्या नावाने पी.आर. कार्ड आहे किंवा नाही याबाबतची खात्री मा.आयुक्त त्वरीत करून घेतील. बीओटी करण्यासाठी साधारणत: तीन महिने लागणार आहेत. बीओटीचे काम जोपर्यंत होत नाही तोपर्यंत जे तेथील भाडेकरू आहेत ते त्या ठिकाणी तिथे राहतील. मा.आयुक्तांनी याप्रकरणी प्रभावीपणे काम सुरू केलेले आहे. भाडेकरूंना एक महिन्याची नोटीस दिलेली आहे. बीओटीचा प्रस्ताव सुरू झाल्यावर तेथील भाडेकरूंना तेथुन जावे लागेल. पोट भाडेकरूंना कुठल्याही प्रकारची संधी तिथे मिळणार नाही. प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी. याप्रकरणी कोणताही भाडेकरू कोर्टात गेला तर नियमानुसार कडक कारवाई त्यांच्याविरूध्द करण्यात येईल. त्यानंतर कुणालाही एक तासाचा वेळ दिला जाणार नाही.

श्रीमती खान मेहरून्निसा : वार्ड क कार्यालयात झोन ऑफिसर, वार्ड इंजिनिअर, कनिष्ठ अभियंता यांची एक महिण्यापासून मागणी करत आहे त्या ठिकाणी इस्टीमेट तयार नाही, काम करण्यास कुणीही तयार नाही.

मा.सभापती : सोमवार पर्यंत प्रशासनाने कार्यवाही करावी.

**विषय क्र. ११३ :**

कार्यकारी अभियंता (वॉर्ड इ व फ) महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर केला आहे की, शिवाजीनगर गट क्र.१२६ आणि १२७ सातारा गांव, सिडको येथील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१५,४९,९६१/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्र.३२२ दिनांक ५/२/२००८ अन्वये मा.स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर कामात मा.शहर अभियंता यांनी काही बदल सुचविल्यामुळे सदर कामाचे अंदाजपत्रक सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार सुधारीत करण्यात आले असुन त्याची रक्कम रू.१४,९९,९५०/- इतकी होत आहे.

तरी सदर कामाचे सुधारीत रक्कम रू.१४,९९,९५०/- चे अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे , शिवाजीनगर गट क्र.१२६ आणि १२७ सातारा गांव, सिडको येथील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१५,४९,९६१/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

---

(टीप :- *दि.२१/८/०९ तहकुब सभा दि.२६/८/०९ ला संपन्न झालेल्या सभेत (का.प.क्र.१२) विषय क्र. १२२ पर्यंत आहे.) दि.२७/८/०९ च्या सभेची विषयपत्रिका (का.प.क्र.१३) दि.२३.८.०९ रोजी निर्गमीत करण्यात आली विषय क्र.११३ त्यावर घेतला आहे. त्यामुळे पुढचा क्रमांक १२३ येत आहे.)

---

मा.सभापती : ऐनवेळेचे सर्व प्रस्ताव मंजूर करण्यात येतात.

<u>ऐनवेळचे विषय</u>

**विषय क्र. १२३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.महापौर निवासस्थान येथे छताची दुरूस्ती करणे व इतर कामे करणे करीता सा.बां. विभागाच्या जिल्हा दरसुची सन २००८-०९ नुसार रक्कम रू.७५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरील कामाचा खर्च सन २००९-१० अंतर्गत मनपाच्या सर्व शाळा, दवाखाने व इतर इमारतीची दुरूस्ती करणे या लेखा शिर्षा अंतर्गत करण्यात येईल. मा.महापौर निवाससथानी पावसाच्या पाण्याची गळती होत असल्याने सदरील काम तातडीने हाती घेणे गरजेचे असल्याने उपलब्ध गुत्तेदार श्री.सुनिल खोचे यांच्याकडून काम सुरू करण्यात आलेले आहे. प्रकरणी मान्यतेस्तव मा.आयुक्त यांच्याकडे सादर केले असता मा.आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ चे नियम २ परि नियम २ नुसार मा.स्थायी समितीकडे सादर करणेस आदेशीत केले आहे.

उपरोक्त नुसार सदरील काम उपलब्ध गुत्तेदार श्री.सुनिल खोचे यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा.महापौर निवाससथानी पावसाच्या पाण्याची गळती होत असल्याने छताची दुरूस्ती करणे व इतर कामे तातडीने हाती घेणे गरजेचे असल्याने, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ चे नियम २ परि नियम २ नुसार उपलब्ध

गुत्तेदार श्री.सुनिल खोचे यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२४ :**

कार्यकारी अभियंता (इ व फ), महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.८० एस. टी. मध्यवर्ती कार्यशाळा कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था ते विमानतळ संरक्षक भिंती पर्यंतच्या नाल्या लगतची ड्रेनेज लाईन दुरूस्त करणे (मार्गे मुकुंदवाडी अंबिकानगर वॉर्ड क्र.८०) च्या कामासाठी रक्कम रूपये ८,८९,१००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा.शहर अभियंता यांची दिनांक ८/९/२००८ अन्वये मंजुरी प्राप्त असुन ई-निविदा द्वारे फेर निविदा मागविल्या असता प्राप्त निविदा मध्ये तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.७८% जास्त दराची श्री.फारूकी जकीरूद्दीन सिद्दीकी यांची निविदा आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने संबंधीतास दराचे पृथ:करण मागविले असता प्राप्त दर हे सन २००८-०९ चे दरसुचीनुसार तुलना केल्यास अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२.१५% कमी आहेत. म्हणून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.७८% जास्त दराची निविदा दरास मा.आयुक्तांनी दिनांक १२/८/२००९ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

सबब तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.७८% जास्त दराची श्री.फारूकी जकीरूद्दीन सिद्दीकी यांची निविदा मंजुरीस्तव व सदर कामासाठी लागणारी वाढीव रक्कम मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.८० एस. टी. मध्यवर्ती कार्यशाळा कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था ते विमानतळ संरक्षक भिंती पर्यंतच्या नाल्या लगतची ड्रेनेज लाईन दुरूस्त करणे (मार्गे मुकुंदवाडी अंबिकानगर वॉर्ड क्र.८०) च्या कामासाठी प्राप्त झालेली सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.७८% जास्त दराची श्री.फारूकी जकीरूद्दीन सिद्दीकी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिडको रामनगर एन-२ मधील रस्त्याचे कॉंक्रेटींग करणे व स्ट्रॉम वॉटर गटार बांधणे या कामासाठी रक्कम रूपये ३५,४३,३९१/- चे अंदाजपत्रक सा.बां. विभागाच्या सन २००५-०६ च्या जिल्हा दरसूचीनुसार तयार करण्यात आले असुन कामाची निविदा रितसर ई-निविदा मार्फत काढण्यात येवुन सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.१२% कमी दराने मक्तेदार श्री.एस.के.गोसावी यांना देण्यात आलेले होते. मक्तेदाराचे काम चालु असुन रोडच्या दोन्ही साईडने गटार न बांधण्यामुळे पावसाचे पाणी जमा होऊन लोकांच्या घरात जात असल्या कारणाने तसेच अर्धवट कामामुळे किरकोळ अपघात होत असल्याने सदरील कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.४९,१३,६०८/- चे तयार करण्यात आले असून सदर वाढीव कामासाठी रक्कम रूपये १०.०० लक्षची तरतुद मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.४८८ दि.२.३.२००९ नुसार वळती करून दिलेली असून तसेच उर्वरीत तरतुद सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.१२% कमी दराने असल्याने होणाऱ्या बचतीमधुन करण्यात येणार आहे. सदरील कामासाठी अर्थसंकल्प सन २००९-१० स्पील ओव्हर मध्ये तजविज करण्यात आलेली आहे.

करीता रक्कम रू.४९,१३,६०८/- चा सुधारीत अंदाजपत्रकाचा प्रस्ताव तसेच सदरील वाढीव काम त्वरीत करणे आवश्यक असल्याने कामाचे मुळ गुत्तेदार श्री.एस.के.गोसावी यांच्याकडून मुळ

मंजूर निविदा दरानुसार म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.१२% कमी दराने करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको रामनगर एन-२ मधील रस्त्याचे कॉंक्रेटींग करणे व स्ट्रॉम वॉटर गटार बांधणे या कामामध्ये वाढीव कामामुळे या कामासाठीचे सुधारीत अंदाजपत्रक रू.४९,१३,६०८/- तसेच वाढीव काम मुळ मंजुर निविदा दरानुसार म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.१२% कमी दराने कामाचे मुळ गुत्तेदार श्री.एस.के.गोसावी यांच्याकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२६ :**

कार्यकारी अभियंता (वॉर्ड इ व फ) महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.९७ सादातनगर येथील नाला सफाई करण्याच्या कामाकरीता सन २००६-०७ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.३,११,६३७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन, संबंधीत नाल्यामध्ये गाळ साचलेला असल्याने व सर्वत्र दुर्गंधी पसरली असल्याने सदरील काम तातडीने हाती घेणे आवश्यक आहे. तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध कंत्राटदार यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.९७ सादातनगर येथील नाल्यामध्ये गाळ साचल्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरली असल्याने नाला सफाईचे काम तातडीने हाती घेण्याचे दृष्टीने तयार केलेल्या रक्कम रू.३,११,६३७/- चे अंदाजपत्रकानुसार सदरील काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध कंत्राटदार यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२७ :**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या विशाल मार्केट, रेल्वेस्टेशन रोड येथे राखून ठेवण्यात आलेल्या जागेत सी.टी.स्कॅन, एम.आर.आय., एक्स-रे, मॅमोग्राफी, सोनोग्राफी, पॅथॅलॉजी लॅब इत्यादीचे डायग्नोस्टीक सेंटर बी.ओ.टी. तत्वावर सुरू करण्यासाठी मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.९७ दिनांक ३१.१.२००८ नुसार मान्यता प्राप्त आहे.

मा.आयुक्त यांच्या दिनांक १०/८/२००९ रोजीच्या मान्यतेनुसार अल्प मुदतीची EOI इच्छुक Bidders कडून दि.२७/८/२००९ पर्यंत कार्यालयीन वेळेत प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यानुसार दि.२७/८/२००९ रोजी दुपारी ५.४५ वाजेपर्यंत मे.तापडिया डायग्नोस्टीक सेंटर, औरंगाबाद यांचेकडून बंद लिफाफ्यामध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. विषयांकित प्रकरणी एकच प्रस्ताव प्राप्त झाला आहे. विषयांकित प्रकरणी एकच प्रस्ताव प्राप्त झाला आहे. यापुर्वी दोन वेळेस जाहीर निविदा EOI साठी प्रसिध्द करूनही प्रत्येक वेळेस एकच EOI निविदा प्राप्त झाल्यामुळे तिसऱ्या वेळेस EOI निविदा प्रसिध्दीस देण्यात येऊनही विहित वेळेपुर्वी एकच EOI निविदा प्राप्त झाली आहे.

सदरची EOI निविदा मे.तापडिया डायग्नोस्टिक सेंटर यांची प्राप्त झाली असून मा.सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यानुसार सात वर्षाच्या कालावधीसाठी प्रस्तावित विशाल मार्केट, रेल्वे स्टेशन रोड येथील जागा देण्यास मान्यता देण्यास हरकत नाही. इतर अटी व शर्तीबाबत स्वतंत्ररित्या नियमावली तयार करण्यात येऊन मा.स्थायी समिती समोर ठेवण्यात येईल.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

मा. सभापती : प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे. अटी शर्ती बाबत प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या विशाल मार्केट, रेल्वेस्टेशन रोड येथे राखून ठेवण्यात आलेल्या जागेत सी.टी.स्कॅन, एम.आर.आय., एक्स-रे, मॅमोग्राफी, सोनोग्राफी, पॅथॅलॉजी लॅब इत्यादीचे डायग्नोस्टीक सेंटर बी.ओ.टी. तत्वावर सुरू करण्यासाठी मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. ९७ दिनांक ३१.१.२००८ नुसार मान्यता झाल्याप्रमाणे, मे.तापडिया डायग्नोस्टिक सेंटर यांची प्राप्त झालेल्या निविदानुसार विशाल मार्केट, रेल्वे स्टेशन रोड येथील जागा देण्यास मान्यता देण्यात येत आहे. इतर अटी शर्ती बाबत प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२८ :**

मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे मान्यते अन्वये उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, महानगरपालिकेच्या मालकीच्या विविध व्यापारी संकुलातील दुकाने तीस वर्षाच्या भाडेपट्टयावर देण्यासाठी दिनांक २६-६-२००९ रोजी स्थानिक वर्तमानपत्रात जाहीर निविदा प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतु सदर निविदा प्रक्रीयेस दिनांक ४-७-२००९ रोजी मा.स्थायी समितीने स्थगिती दिली होती.

त्यानंतर सादिया मार्केट दुकान क्र.जी-८, जी-९ व बी-७ या दुकाना वगळुन निविदा प्रक्रीया सुरू करण्यास मान्यता दिली असता दिनांक १८-८-२००९ पर्यंत निविदा मागविण्यात येवुन दिनांक २१-८-२००९ रोजी सदरील निविदा उघडण्यात आल्या आहेत.

व्यापारी संकुल निहाय निविदा प्राप्त झाल्या असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**तुलनात्मक तक्ता (अ) :-**

| अ.क्र. | व्यापारी संकुलाचे नांव | नांव | दुकान क्र. | अपेक्षित भाडे प्रती माह | नमूद दर |
|---|---|---|---|---|---|
| **१** | **कबाडीपूरा** | **देविदास चित्ते** | **३** | **२५२०** | **४२८५** |
| २ | कबाडीपूरा | शेख मोहमंद शकील | ३ | २५२० | ३३०० |
| ३ | कबाडीपूरा | शेख मोहमंद शकील | ४ | २०४८ | २८०० |
| **४** | **कबाडीपूरा** | **दिलीप लक्ष्मण चित्ते** | **४** | **२०४८** | **३५८६** |
| ५ | **पिया मार्केट** | प्राजक्ता यशंवत कांबळे | २० | ५४० | ९५५ |
| **६** | **पिया मार्केट** | **विजय पोपटलाल जैन** | **२०** | **५४०** | **१११११** |
| ७ | पिया मार्केट | प्राजक्ता यशंवत कांबळे | २१ | ५४० | ९५५ |
| **८** | **पिया मार्केट** | **संजय केवलचंद जैन** | **२१** | **५४०** | **११११** |
| ९ | पिया मार्केट | प्राजक्ता यशंवत कांबळे | २२ | ५४० | ९५५ |
| **१०** | **पिया मार्केट** | **प्रदिप विजयलाल सकलेचा** | **२२** | **५४०** | **१०५१** |
| **११** | **पिया मार्केट** | **दांडगे असिमकुमार** | **२५** | **५४०** | **११८८** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२ | पिया मार्केट | अजमत अंजुम | २५ | ५४० | ७८६ |
| १३ | नुपूर अपार्टमेंट | कोळेकर हिराबाई भानुदास | ९ | ११९७ | १५७५ |
| १४ | नुपूर अपार्टमेंट | कोलते जयश्री अप्पासाहेब | ९ | ११९७ | १७९० |
| **१५** | **नुपूर अपार्टमेंट** | **स्वप्नाली दांडगे** | **९** | **११९७** | **२०१०** |
| १६ | नुपूर अपार्टमेंट | सिमा संजय जैन | ९ | ११९७ | १५५५ |
| १७ | **जय टॉवर** | परदेशी ललीता शांतीलाल | ५ | २८७५ | २९०६ |
| १८ | जय टॉवर | वाघचौरे विजय लक्ष्मण | ५ | २८७५ | २५१० |
| **१९** | **जय टॉवर** | **अश्विन जयनारायण बाहेती** | **५** | **२८७५** | **४५००** |
| २० | जय टॉवर | सौ.आशा अश्विनकुमार खुल्लर | ५ | २८७५ | ३५०१ |
| २१ | जय टॉवर | थोरात संगिता रमेश | ९ | १७१६ | २२२२ |
| **२२** | **जय टॉवर** | **जेटीथोर लता इंद्रजीत** | **९** | **१७१६** | **२५००** |
| २३ | जय टॉवर | वाघचौरे छाया विजय | ९ | १७१६ | २००० |
| २४ | जय टॉवर | परदेशी ललीता शांतीलाल | २१ | १७१६ | १८०१ |
| **२५** | **जय टॉवर** | **तांबे विजय देवराव** | **२१** | **१७१६** | **२६१०** |
| **२६** | **सादिया मागील** | **मोहमंद सलीम मो.युसूफ** | **९-अ** | **७२७** | **२२२२** |
| २७ | सादिया मागील | रिजवान अब्दुल सत्तार | ९-अ | ७२७ | २००० |
| २८ | सादिया मागील | सोहेल अहेमद अली अहेमद | ९-अ | ७२७ | १६५५ |
| २९ | सादिया मागील | नंदकिशोर सर्जेराव काळे | ९-अ | ७२७ | ९०१ |
| ३० | संत गाडगेबाबा | कैलास गौरीशंकर राठोड | १६ | ९०० | १८०० |
| ३१ | संत गाडगेबाबा | सदानंद काशीनाथ तिळवणकर | १६ | ९०० | १८०० |
| ३२ | संत गाडगेबाबा | कविता गणेश राठोड | १६ | ९०० | २१२१ |
| ३३ | संत गाडगेबाबा | संजीव पंढरीनाथ उन्हाळे | १८ | ९०० | ३००० |
| ३४ | संत गाडगेबाबा | गणेश रमेशलाल राठोड | १८ | ९०० | १८१८ |
| ३५ | संत गाडगेबाबा | कैलास गौरीशंकर राठोड | १८ | ९०० | १८०० |
| ३६ | एकनाथनगर | पुष्पा सुभाष पैठणे | ७ | ३०० | ७१० |
| ३७ | एकनाथनगर | शारदा विजय दिवेकर | ७ | ३०० | ७०१ |
| ३८ | एकनाथनगर | कला किशोर जिवने | २९ | ३०० | ९०१ |
| ३९ | एकनाथनगर | संगिता रमेश थोरात | २९ | ३०० | ७८७ |
| ४० | एकनाथनगर | आयेशा मो.मसिओद्दीन सिद्दीकी | २९ | ३०० | ७०० |
| ४१ | साईनगर एन-६ | राजकुमार दयाराम मंडावत | ३ | १३२० | ३६२१ |
| ४२ | साईनगर एन-६ | प्रफुल्लता दिलीपराव कलकर्णी | ३ | १३२० | ३००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **४३** | साईनगर एन-६ | दिपक सोपानराव ठाले | ३ | १३२० | ४१२५ |
| **४४** | साईनगर एन-६ | रमेश सुखदेव चव्हाण | ३ | १३२० | २६१५ |
| **४५** | साईनगर एन-६ | हेरकर शिवसांब रामलिंग | ३ | १३२० | २३३३ |
| **४६** | साईनगर एन-६ | पवनकुमार कल्याणमलजी पाटणी | ३ | १३२० | १५५७ |
| **४७** | साईनगर एन-६ | नंदकिशोर सर्जेराव काळे | ३ | १३२० | १३२१ |
| **४८** | साईनगर एन-६ | नरेंद्रकुमार विजयकुमार जैस्वाल | ३ | १३२० | ३०११ |

यांप्रमाणे एकूण ४८ दुकानांसाठी अपेक्षित भाडयापेक्षा अतिउच्चतम निविदाधारकांची निविदा मान्य करणे असल्यास त्यांच्याकडुन एक वर्षाचे आगाऊ भाडे (पाच टक्के सेवाशुल्कासह) आणि अनामत रक्कम घेवुन नियमाप्रमाणे मालमत्ता कर आकारावा लागेल.

तसेच खालील दर्शविल्या व्यापारी संकुलातील दुकानांचे प्रत्येकी एकच निविदा प्राप्त झाली असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**<u>तुलनात्मक तक्ता (ब) :-</u>**

| **अ.क्र.** | **व्यापारी संकुलाचे नांव** | **नांव** | **दुकान क्र.** | **अपेक्षित भाडे प्रती माह** | **नमूद दर** |
|---|---|---|---|---|---|
| १ | **कबाडीपूरा** | शेख मोहमंद शकील | २ | ११०३ | **२५००** |
| २ | कबाडीपूरा | मोहमंद शकील मो.साबेर | १४ | १०१७ | **११००** |
| ३ | कबाडीपूरा | खान इम्रान अब्दुल रज्जाक | १६ | १८३६ | **२०००** |
| ४ | कबाडीपूरा | खान इम्रान अब्दुल रज्जाक | १७ | २३४५ | **१८००** |
| ५ | पिया मार्केट | अजमत अंजुम | २४ | ५४० | **५९५** |
| ६ | पिया मार्केट | गजानन दिगंबर जोशी | २८ | ५४० | **११४०** |
| ७ | नुपूर अपार्टमेंट | अनघा वसंत पाटील, दिलासा महिला गृहउद्योग | ५ | १३६८ | **५०००** |
| ८ | नुपूर अपार्टमेंट | कोलते अप्पासाहेब पुजांराम | ६ | १३६८ | **१७८९** |
| ९ | जय टॉवर | सौ.मनिषा विजय संकुडे | ३ | १५२५ | **२०१०** |
| १० | सादिया मागील | सोहेल अहेमद अली अहेमद | टेलीफोन बुथ | ५४६ | **३१५५** |
| ११ | एकनाथनगर | पुष्पा सुभाष पैठणे | १० | ३०० | **७१०** |
| १२ | एकनाथनगर | लिलाबाई तात्याराव साळवे | १४ | ३०० | **५५०** |

यांप्रमाणे अपेक्षित भाडयापेक्षा जास्तीची उच्चतम बोलीधारकांची **(कबाडीपूरा दु.क्र.१७ चे अपेक्षित भाडयापेक्षा कमी रक्कम रू.१८००/-)** निविदा मान्य करणे असल्यास त्यांच्याकडुन एक वर्षाचे आगाऊ भाडे (पाच टक्के सेवाशुल्कासह) आणि अनामत रक्कम घेवुन नियमाप्रमाणे मालमत्ता कर आकारावा लागेल.

**तुलनात्मक तक्ता (क) :-**

| अ.क्र. | व्यापारी संकुलाचे नांव | नांव | दुकान क्र. | अपेक्षित भाडे प्रती माह | नमूद दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | **संत गाडगेबाबा** | रूपेश चंद्रकांत तिळवणकर | ११ | ९०० | **१८००** |
| २ | संत गाडगेबाबा | कैलास गौरीशंकर राठोड | ११ | ९०० | **१८००** |

याप्रमाणे सदरील व्यापारी संकुलातील दुकान क्र.११ साठी दोनच निविदा प्राप्त झाले असून दोघांचेही दर समान आहेत. सदरील बाबतीत निर्णय घेणेस्तव.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या मालकीच्या विविध व्यापारी संकुलातील दुकाने तीस वर्षाच्या भाडेपट्टयावर देण्यासाठी व्यापारी संकुल निहाय निविदा प्राप्त झालेल्या निविदा स्विकारणेस खाली दर्शविल्याप्रमाणे मंजुरी देण्यात येते. एकूण २८ दुकानांसाठी अपेक्षित भाडयापेक्षा अतिउच्चतम निविदाधारकांची निविदा मान्य करण्यास मंजुरी देण्यात येते.

**तक्ता (अ) :-**

| अ.क्र. | व्यापारी संकुलाचे नांव | नांव | दुकान क्र. | अपेक्षित भाडे प्रती माह | नमूद दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | कबाडीपूरा | देविदास चित्ते | ३ | २५२० | ४२८५ |
| २ | कबाडीपूरा | दिलीप लक्ष्मण चित्ते | ४ | २०४८ | ३५८६ |
| ३ | पिया मार्केट | विजय पोपटलाल जैन | २० | ५४० | ११११ |
| ४ | पिया मार्केट | संजय केवलचंद जैन | २१ | ५४० | ११११ |
| ५ | पिया मार्केट | प्रदिप विजयलाल सकलेचा | २२ | ५४० | १०५१ |
| ६ | पिया मार्केट | दांडगे असिमकुमार | २५ | ५४० | ११८८ |
| ७ | नुपूर अपार्टमेंट | स्वप्नाली दांडगे | ९ | ११९७ | २०१० |
| ८ | जय टॉवर | अश्विन जयनारायण बाहेती | ५ | २८७५ | ४५०० |
| ९ | जय टॉवर | जेटीथोर लता इंद्रजीत | ९ | १७१६ | २५०० |
| १० | जय टॉवर | तांबे विजय देवराव | २१ | १७१६ | २६१० |
| ११ | सादिया मागील | मोहमंद सलीम मो.युसूफ | ९-अ | ७२७ | २२२२ |
| १२ | संत गाडगेबाबा | कविता गणेश राठोड | १६ | ९०० | २१२१ |
| १३ | संत गाडगेबाबा | संजीव पंढरीनाथ उन्हाळे | १८ | ९०० | ३००० |
| १४ | एकनाथनगर | पुष्पा सुभाष पैठणे | ७ | ३०० | ७१० |
| १५ | एकनाथनगर | कला किशोर जिवने | २९ | ३०० | ९०१ |
| १६ | साईनगर एन-६ | दिपक सोपानराव ठाले | ३ | १३२० | ४१२५ |

**तक्ता (ब) :-**

| अ.क्र. | व्यापारी संकुलाचे नांव | नांव | दुकान क्र. | अपेक्षित भाडे प्रती माह | नमूद दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | **कबाडीपूरा** | शेख मोहमंद शकील | २ | ११०३ | **२५००** |
| २ | कबाडीपूरा | मोहमंद शकील मो.साबेर | १४ | १०१७ | **११००** |
| ३ | कबाडीपूरा | खान इम्रान अब्दुल रज्जाक | १६ | १८३६ | **२०००** |
| ४ | कबाडीपूरा | खान इम्रान अब्दुल रज्जाक | १७ | २३४५ | **१८००** |
| ५ | पिया मार्केट | अजमत अंजुम | २४ | ५४० | **५९५** |
| ६ | पिया मार्केट | गजानन दिगंबर जोशी | २८ | ५४० | **११४०** |
| ७ | **नुपूर अपार्टमेंट** | अनघा वसंत पाटील, दिलासा महिला गृहउद्योग | ५ | १३६८ | **५०००** |
| ८ | नुपूर अपार्टमेंट | कोलते अप्पासाहेब पुजांराम | ६ | १३६८ | **१७८९** |
| ९ | **जय टॉवर** | सौ.मनिषा विजय संकुडे | ३ | १५२५ | **२०१०** |
| १० | सादिया मागील | सोहेल अहेमद अली अहेमद | टेलीफोन बुथ | ५४६ | **३१५५** |
| ११ | एकनाथनगर | पुष्पा सुभाष पैठणे | १० | ३०० | **७१०** |
| १२ | एकनाथनगर | लिलाबाई तात्याराव साळवे | १४ | ३०० | **५५०** |

**तक्ता (क) :-**

| अ.क्र. | व्यापारी संकुलाचे नांव | नांव | दुकान क्र. | अपेक्षित भाडे प्रती माह | नमूद दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | **संत गाडगेबाबा** | रूपेश चंद्रकांत तिळवणकर | ११ | ९०० | **१८००** |
| २ | संत गाडगेबाबा | कैलास गौरीशंकर राठोड | ११ | ९०० | **१८००** |

याप्रमाणे सदरील व्यापारी संकुलातील दुकान क्र.११ साठी प्राप्त झालेल्या दोन निविदांचे दर समान असल्याने वाटाघाटीस बोलावून जो निविदाधारक जास्तीचे दर देईल त्यास दुकान भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १२९ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ९४ अंतर्गत विविध ठिकाणी पुनःर्डांबरीकरण करणे (विशाल मेगामार्ट ते रेल्वेस्टेशन मुख्य रस्त्यापर्यंत) या कामाचे अंदाजपत्रक सा.बां. खात्याच्या सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रकीय रक्कम रू.१४,९९,०८०/- होत आहे. सदरील काम सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात नवीन डांबरी रस्ते या लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित आहे. त्यास मा.आयुक्त यांनी दि.२७/८/२००९ रोजी मा.स्थायी समिती समोर ठेवण्यास मान्यता दिली आहे.

तरी रक्कम रू.१४,९९,०८०/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ९४ अंतर्गत विविध ठिकाणी पुनःडांबरीकरण करणे (विशाल मेगामार्ट ते रेल्वेस्टेशन मुख्य रस्त्यापर्यंत) या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१४,९९,०८०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३० :**

उप आयुक्त (म.) प्रस्ताव सादर करीत आहेत की, लोखंडी ट्री गार्ड खरेदी या कामाचे अंदाजपत्रक रू.१०,०८,०००/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन २००९-१० या आर्थिक वर्षात वृक्ष प्राधिकरण या लेखा शिर्षातुन करण्यात येत आहे. सदर काम तातडीने करणे आवश्यक आहे.

करीता स्थायी समितीमध्ये मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ नियम २(२) अंतर्गत मंजुरीकरीता प्रस्ताव सादर करणे बाबत सुचविले आहे. सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस करून मा.स्थायी समितीची मंजुरी घेणे बाबत आदेशीत केले आहे.

त्यानुसार उपरोक्त रक्कम रू.१०,०८,०००/- चे काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ नियम २(२) अंतर्गत उपलब्ध एजन्सी मार्फत करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लोखंडी ट्री गार्ड खरेदी या कामासाठी तयार केलेल्या अंदाजपत्रक रू.१०,०८,०००/- व सदर काम तातडीने करणे आवश्यक असल्याने मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ नियम २(२) अंतर्गत उपलब्ध एजन्सी मार्फत करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कर्यवाही व्हावी.

'राष्ट्रगीता'नंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद